पुण्यनगरी पा.नं. १ व ९.

# महाराष्ट्रात ड्रग्जविरोधात अभियान राबवणार – उपमुख्यमंत्री

## पुण्यात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची परिषद

**पुणे** : युवा पिढीला मादक पदार्थांच्या विळख्यातून सोडवण्यासाठी महाराष्ट्रात ड्रग्जविरोधात व्यापक अभियान छेडण्यात येणार असून त्यासाठी रणनीतीची आखणी सुरू आहे, अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पुण्यात दिली.

राज्यातील गुन्हे आणि कायदा-सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची एक बैठक शनिवारी पुण्यात झाली; त्या वेळी गृहमंत्री फडणवीस बोलत होते. राज्याचे गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आनंद लिमये, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, पोलीस आयुक्त रितेश कुमार, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, कारागृह विभागाचे अतिरिक्त पोलीस



महासंचालक अमिताभ गुप्ता आदी वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. राज्यपातळीवरील या महत्त्वाच्या बैठकीत विविध विषयांवर सादरीकरण करण्यात आले. राज्याच्या निरनिराळ्या प्रकारच्या गुन्ह्यांची स्थिती आणि त्यावर पोलिसांचा प्रतिसाद, गुन्हेवाढीची कारणे याचा समग्र आढावा बैठकीत घेण्यात आला. अपराधसिद्धीचा दर वाढवण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवरही यावेळी चर्चा झाली. नव्या सरकारमध्ये बदल्या आणि पोस्टिंगसाठी भ्रष्टाचाराला कुणालाही सामोरे जावे लागणार नाही. त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांनी पारदर्शी पद्धतीने काम करावे आणि पोलीस दलाला पूर्वीचा नावलौकिक प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी, असे आवाहन फडणवीस यांनी केले. बैठकीत उपमुख्यमंत्र्यांनी सागरी सुरक्षेच्या प्रस्तावांना तातडीने गती देण्याचेही निर्देश दिले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेटी द्याव्यात, तपासावरील देखरेखीची प्रक्रिया अधिक कार्यक्षम करण्यात यावी, वेगवेगळ्या जिल्ह्यातील चांगल्या तपास पद्धतींचा स्वीकार करावा, या सूचना देतानाच वाळू आणि दारूची तस्करी करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी दिले. ▶▶ पान ९ वर...

# महाराष्ट्रात ड्रग्जविरोधात अभियान राबवणार – उपमुख्यमंत्री

(पान १ वरून) मादकद्रव्यांच्या बाबतीत पोलिसांनी 'झिरो टॉलरन्स'ची भूमिका ठेवावी. उद्योगांना त्रास देणाऱ्या संघटित गुन्हेगारीचा कसोशीने बीमोड करावा आणि त्यांच्याविरोधात कारवाई करण्यास अजिबात कचरू नका, अशी सूचना फडणवीस यांनी यावेळी केली.

'सीसीटीएनएस' प्रणालीचा महत्तम वापर करण्याच्या सूचना फडणवीस यांनी यावेळी दिल्या. कायदा व सुव्यवस्था बिघडवण्यास कारणीभूत ठरणाऱ्या सोशल मीडियाच्या दुरुपयोगाकडे पोलीस दलाने बारकाईने लक्ष ठेवावे. पोलिसांचा सरकारी वकिलांशी अधिकाधिक संवाद, तपासात त्रुटी न ठेवणे आणि त्यातून अपराधसिद्धीचा दर वाढण्यासाठी करावयाच्या उपाययोजना इत्यादींबाबतही त्यांनी यावेळी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना विस्तृत मार्गदर्शन केले.

२०२१ मध्ये केंद्र सरकारने देशातील सर्वोत्कृष्ट १० पोलीस स्थानकांमध्ये सांगलीतील शिराळा पोलीस ठाण्याची सातव्या क्रमांकावर निवड केली होती. त्याचे पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लावार तसेच केंद्रीय गृहमंत्री करंडक प्राप्त झालेल्या महाराष्ट्र पोलीस बिनतारी विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक रितेश कुमार यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

## सर्वोत्कृष्ट पोलीस घटक स्पर्धेचे पारितोषिक वितरण

राज्यातील पोलीस घटकांची कार्यक्षमता, कामगिरी वाढवणे, गुन्हेगारीला आळा, तपास, कायदा-सुव्यवस्था इत्यादीबाबतीत दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या पोलीस घटक स्पर्धेच्या २०२१ चे पारितोषिक वितरण उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी खालील अधिकाऱ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

**वर्गवारी 'अ'**

सर्वोत्कृष्ट पोलीस घटक : पोलीस अधीक्षक जालना (विनायक देशमुख), पोलीस अधीक्षक रायगड (अशोक दुधे), सर्वोत्कृष्ट पोलीस घटक (सत्र न्यायालय दोषसिद्धी) : पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग (राजेंद्र दाभाडे), सर्वोत्कृष्ट पोलीस घटक (पोलिसिंगमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर) : पोलीस अधीक्षक बीड (आर. राजा), सर्वोत्कृष्ट पोलीस घटक पारितोषिक (कम्युनिटी पोलिसिंग) : पोलीस अधीक्षक गडचिरोली (अंकित गोयल).

**वर्गवारी 'ब'** :

सर्वोत्कृष्ट पोलीस घटक पारितोषिक : पोलीस आयुक्त, नागपूर (अमितेश कुमार), पोलीस आयुक्त पुणे (अमिताभ गुप्ता), सर्वोत्कृष्ट पोलीस घटक (पोलिसिंगमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर) : पोलीस आयुक्त मीरा-भाईंदर, वसई-विरार (सदानंद दाते), सर्वोत्कृष्ट पोलीस घटक (दोषसिद्धी) तसेच सर्वोत्कृष्ट पोलीस घटक (कम्युनिटी पोलिसिंग) : पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण (तेजस्वी सातपुते).

**वर्गवारी 'क'** :

सर्वोत्कृष्ट पोलीस घटक पारितोषिक : पोलीस उपायुक्त परिमंडळ ६ : (कृष्णकांत उपाध्याय), पोलीस उपायुक्त परिमंडळ ११ (विशाल ठाकूर), सर्वोत्कृष्ट पोलीस घटक (दोषसिद्धी) : पोलीस उपायुक्त परिमंडळ १ (शशिकुमार मीना), सर्वोत्कृष्ट पोलीस घटक (पोलिसिंगमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर) : पोलीस उपायुक्त परिमंडळ ११ (विशाल ठाकूर), सर्वोत्कृष्ट पोलीस घटक (कम्युनिटी पोलिसिंग) : पोलीस उपायुक्त परिमंडळ ६ : कृष्णकांत उपाध्याय.

CamScanner

## सिझानचा जामीन फेटाळला

**नालासोपारा :** तुनीषा शर्मा आत्महत्या प्रकरणातील संशयित आरोपी सिझान खान याच्या जामीन अर्जावर शुक्रवारी वसई सत्र न्यायालयात सुनावणी होती. मात्र आजच्या झालेल्या सुनावणीत वसई न्यायालयाचे न्यायमूर्ती आर. डी. देशपांडे यांनी सिझान खानचा जामीन अर्ज फेटाळला आहे. त्यामुळे सीझानला वसई न्यायालयाने झटका दिल्याने त्याच्या १४ दिवसांची न्यायालयीन कोठडीत वाढ केली आहे..यावर त्याचे वकील शैलेंद्र मिश्रा यांनी उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याची माहिती माध्यमांसमोर दिली आहे. दरम्यान आम्ही अर्धी लढाई जिंकली,आम्हांला न्यायालयावर विश्वास आहे, तपास योग्य दिशेने केला जात आहे. आम्हाला न्याय मिळेल असे पवन शर्मा यांनी सांगितलं.सिझानच्या आईच्या सांगण्यावरून तुनीषाला औषध दिली जात होती. ज्या डॉक्टरची चिठ्ठी होती त्याला तुनीषाचे नातेवाईक ओळखत नव्हते असा आरोप तुनीषाचे वकील तरुण शर्मा यांनी माध्यमाकडे केला आहे. दरम्यान, सिझानची आई आणि बहिणी आल्या होत्या मात्र त्यांनी कोणतीही आपली बाजू न मांडता येणारा काळ सांगेल अस सांगून काही न बोलता निघून गेले.

## वेश्याव्यवसाय चालवऱ्या दोघांना अटक

← पुढारी पा.नं.५.

**मिरारोड :** काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीत वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या दोन दलालांना अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने अटक केली असून त्यांच्या तावडीतून दोन पीडित मुलींची सुटका केली आहे. काशीमिरा पोलीस ठाणे हद्दीतील मुंबई-अहबदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील साई रिजेंसी लॉजिंग बोडिंगजवळ दोन दलाल वेश्याव्यवसायासाठी पीडित मुलींना घेऊन येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. हे दलाल ग्राहकांना त्यांच्या मोबाईलवर व्हाट्सअपवर पीडीत मुलींचे फोटो पाठवून वेश्याव्यवसायाचा कारोबर चालवत होते. मिळालेल्या माहितीनुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने साई रिजेंसी लॉजिंग बोर्डिंगजवळ सापळा रचला. तेथे रिक्षाने पीडित मुलींना दलाल घेऊन येताच त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून दोन पीडित मुलींची सुटका करण्यात आली आहे. या दोन्ही दलालाकडे अधिक चौकशी केली असता हे दोन्ही दलाल गेल्या तीन वर्षांपासून मुंबई, मिरा भाईंदर, वसई विरार व आसपासच्या परिसरात ग्राहकांना मोबाइल व्हाट्सअपवर फोटो पाठवून वेगवेगळ्या लॉजिंग बोर्डिंगमध्ये पीडित मुलींकडून वेश्याव्यवसाय करून घेत होते. दलालाकडून मुलींना सोडण्यासाठी वापरण्यात येणारी रिक्षा जप्त करण्यात आली आहे. वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या दोन दलालावर काशिमिरा पोलीस ठाण्यात पिटा कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलींना महिला सुधारगृहात पाठवण्यात आले आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समीर अहिराव यांनी पथकासह केली आहे.

# आफताबने करवतीने केले होते श्रद्धा वालकरच्या मृतदेहाचे तुकडे

← पुण्यनगरी पा.नं.५.

**। नवी दिल्ली :** आफताब अमीन पुनावालाने आपली लिव्ह इन पार्टनर श्रद्धा वालकर हिची हत्या केल्यानंतर करवतीने तिच्या शरीराचे तुकडे केले होते. ऑटोप्सी अहवालातून ही माहिती समोर आली आहे. आतापर्यंत मिळालेल्या माहितीच्या आधारावर पोलीस जानेवारी महिन्याच्या अखेरीस आरोपपत्र दाखल करू शकतात.

आफताबने श्रद्धाची हत्या केल्यानंतर तिच्या शरीराचे ३५ तुकडे करून ते महरौलीच्या जंगलात फेकले होते. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारावर पोलिसांनी जंगलातून २३ हाडे जप्त केली. या हाडांची न्यायवैद्यक चाचणी करण्यात आली. यानंतर शवविच्छेदनासह इतरही अनेक चाचण्या करण्यात आल्या. शनिवारी या हाडांचा ऑटोप्सी अहवाल समोर आला. त्यानुसार आफताबने करवतीने श्रद्धाच्या मृतदेहाचे तुकडे केले होते.

पोलिसांना सापडलेली ती हाडे श्रद्धाचीच असल्याचे डीएनए चाचणीत स्पष्ट झाले आहे. याशिवाय माइटोकॉन्ड्रियल चाचणीतही हाडे आणि केसांचे नमुने श्रद्धाचेच असल्याचे निष्पन्न झाले होते. आफताबने नार्को आणि पॉलिग्राफ चाचणीत हत्येची कबुली दिली आहे. आफताब आणि श्रद्धा लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये होते. त्यांच्यात अनेकदा टोकाची भांडणे झाली होती. मुंबईत असताना आफताबने श्रद्धाला मारहाणदेखील केली होती. गतवर्षी ते दिल्लीत स्थलांतरित झाले.

आफताबने १८ मे रोजी श्रद्धाची गळा आवळून हत्या केली. यानंतर ३०० लिटरचा फ्रीज विकत घेऊन त्यामध्ये तिचा मृतदेह ठेवला. आफताबने श्रद्धाच्या मृतदेहाचे ३५ तुकडे करून त्यांची विल्हेवाट लावली. सलग १८ दिवस तो दररोज रात्री २ वाजता तुकडे जंगलात फेकण्यासाठी जात होता. श्रद्धाच्या वडिलांच्या तक्रारीवरून दिल्ली पोलिसांनी १२ नोव्हेंबर रोजी आफताबला अटक केली. तो सध्या न्यायालयीन कोठडीत असून त्याने जामीन घेण्यास नकार दिला आहे.

पुढारी पा.नं.५.

# वाहन व जबरी चोरीसह घरफोडी करणाऱ्या ५ जणांना अटक; वालीव पोलीसांची कामगिरी

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

वसई येथील वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत २८ डिसेंबर २०२२ रोजी सायंकाळी ७ वा. ते २९ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी १० वाजेदरम्यान तुंगारेश्वर इंडस्ट्रीयल कंपनीमध्ये अज्ञात चोरट्याने प्रवेश करून कंपनी समोरच्या गटारावरील सुमारे ७० हजार रुपये किंमतीची ७ लोखंडी झाकणे चोरी केल्याप्रकरणी वालीव पोलिसांनी ५ चोरट्यांना अटक केली. आरोपींनी मुंबईसह वालीव पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकूण ८ वाहन व जबरी चोरीसह घरफोडीचे गुन्हे केल्याचे पोलीस चौकशीतून उघड झाले आहे.

वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गटारांवरील लोखंडी झाकणे चोरीला जात असल्याने उघड्या गटारांमध्ये पडून अपघात होण्याचे प्रमाण वाढले होते. याप्रकरणी वसई-विरार महापालिकेने स्थानिक पोलिसांकडे तक्रार अर्ज केला होता. याचप्रमाणे मिरा-भाईंदर महापालिकेने देखील गटारांवरील झाकणे चोरीला जात असल्याने उघड्या गटारांत पडून अनेक पादचारी तसेच जनावरे पडून जखमी होत असल्यामुळे चोरट्यांना गजाआड करण्यासाठी स्थानिक पोलीस ठाण्यांत तक्रार अर्ज केला आहे. दरम्यान वालीव पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्याचा छडा पोलिसांनी नुकताच लावला. वारंवार गटारांवरील लोखंडी झाकणांची होत असलेल्या चोऱ्यांमुळे चोरट्याचा शोध पोलिसांकडून सुरु होता. त्यांना गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांनी विकी नरेंद्र सिंग (२१), अजित शिबु ठाकूर (३०), विघ्नेश केशव पारधी (२२) सर्व रा. वालीव, हेमंत रमेश मोकाशी (२५) रा. भोयदापाडा नाका, वसई (पुर्व) व मोतीम अब्दुल सज्जाक खान (२१) रा. सोपारा फाटा, नालासोपारा (पूर्व) यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी गटारावरील लोखंडी झाकणे चोरल्याची कबुली दिल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. पोलिसांनी त्यांना अटक करुन त्यांची अधिक चौकशी केली असता त्यांनी वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत तसेच मुंबईच्या वनराई व मालाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहन व जबरी चोरी तसेच घरफोडीचे ८ गुन्हे केल्याचे समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी आरोपींकडून ऑटो रिक्षा, मोटरसायकल, गटारावरील लोखंडी झाकणे, सिलेंडरचे बाटले, रोख रक्कम, ऑटो रिक्षाचे टायर, बॅनरच्या लोखंडी फ्रेम असा एकूण २ लाख ६० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

पुढारी पा.नं.३.

# दागिने चोरणाऱ्या बंटी-बबलीस अटक

## पालघर, ठाणे जिल्ह्यांतील ९ गुन्ह्यांची उकल

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धर्मराज ज्वेलर्स या सोने, चांदी दागिन्यांच्या दुकानात सोन्याचे दागिने चोरी केल्याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात नुकताच अज्ञात व्यक्तीविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचा तपास विरार पोलिसांसह मध्यवर्ती गुन्हे शाखाकडून समांतर सुरु असताना १२ जानेवारीला गुन्हे शाखेच्या पथकाने एका पुरुषांसह महिला या बंटी, बबलीला अटक केली. या बंटी, बबलीने वसई-विरारसह ठाणे व अंबरनाथ परिसरात एकूण ९ गुन्हे केल्याचे चौकशीतून समोर आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.



### कारसह लाखोंचा मुद्देमाल जप्त

**या कारवाईदरम्यान गुन्ह्यात वापरलेली ईको कार, मोबाईल व रोख रक्कम असा एकूण २ लाख ६ हजार ३०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींनी वसई येथील माणिकपूर, विरार, तुळींज, ठाणे जिल्ह्यातील कासारवडवली व अंबरनाथ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकूण ९ गुन्हे केल्याचे चौकशीत उघड झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.**

विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विरार पूर्वेकडील फुलपाडा परिसरात असलेल्या जीवन अपार्टमेंटमध्ये पृथ्वीराज राजपुत यांचे धर्मराज ज्वेलर्स नामक सोन्या-चांदीच्या दागिन्यांचे दुकान आहे. काही दिवसांपूर्वी या दुकानामध्ये अनोळखी व्यक्तीने ग्राहक म्हणून येवून हातचलाखीने दुकानातील ७ ग्राम २०० मिलीग्राम वजनाचे सोन्याची दोन कर्णफुले चोरल्याची घटना घडली होती. याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचा समांतर तपास विरार पोलिसांसह मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेकडून सुरु करण्यात आला होता. गुन्हे शाखेला मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी १२ जानेवारी रोजी मिरा-भाईंदर येथील घोडबंदर गावातील सिलमेटीक कंपनी येथे सापळा रचुन राजेश सायबण्णा कुडनूर (३२) रा. रूम नं. ७६२, स्वामी नगर झोपडपट्टी, अंबरनाथ (प) रेल्वे स्टेशन जवळ, जि. ठाणे व छाया विनोद चव्हाण (४५) रा. परमानंद चाळ, बांद्रा पाड़ा, अंबरनाथ (प), जि.ठाणे यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांची चौकशी केली असता त्यांनीच दागिन्यांची चोरी केल्याचे उघड झाले.

लोकमत पा.नं.५

# गिऱ्हाईक बनून आले अन् हातचलाखीने चोरले सोने

## दुकलीला अटक : गुन्हे शाखेची कामगिरी



ज्वेलर्सकडे चोरी केलेल्या गुन्हेगाराला गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या.

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारच्या ज्वेलर्समध्ये गिऱ्हाईक म्हणून येऊन हातचलाखीने सोन्याचे झुमके चोरून नेणाऱ्या महिलेसह दोन आरोपींना मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पोलिसांना अटक करण्यात यश मिळाले आहे. अटक आरोपीतील एका आरोपीकडून पोलिसांनी पाच गुन्ह्यांची उकल केली आहे.

विरारच्या फुलपाडा येथील जीवन अपार्टमेंटमध्ये असलेल्या पृथ्वीराज राजपूत यांच्या धर्मराज ज्वेलर्समध्ये गिऱ्हाईक म्हणून येऊन आरोपींनी हातचलाखीने ३ जानेवारीला चोरी करून ७ ग्रॅम २०० मिली वजनाचे सोन्याचे दोन झुमके चोरून नेले होते. याप्रकरणी विरार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा करत होती. १२ जानेवारीला घोडबंदर गावातील सिलमेटीक कंपनी येथे सापळा रचून आरोपी राजेश सायबण्णा कुडनूर (३२) आणि अंबरनाथ येथून छाया विनोद चव्हाण (४५) यांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता गुन्ह्यात सहभाग असल्याचे कबूल केले.

गुन्हा करतेवेळी वापरलेली मोटारकार, मोबाइल व रोख रक्कम असे एकूण २ लाख ६ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. आरोपी राजेशवर विरार, तुळींज, माणिकपूर, कासारवडवली आणि अंबरनाथ पोलिस ठाण्यातील गुन्हे दाखल आहेत. येथील पाच गुन्ह्यांची उकल केली आहे.

लोकमत पु-पा-३.

# अतिक्रमण हटवून जागा वापरण्यास टाळाटाळ

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : शहराच्या मुख्य रस्त्यावर होणारी वाहतूककोंडी आणि पार्किंगची जागा नसल्याने बेकायदा रस्त्यावर होणारी पार्किंग समस्या सोडवण्यासाठी गौरव गार्डन कॉम्प्लेक्ससमोरील सरकारी जागा पार्किंग सुविधेसाठी घेण्यास महापालिका आणि वाहतूक पोलिसांनी टाळाटाळ चालविली आहे.

काशीमीरा नाका ते भाईंदर फाटकापर्यंतचा छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा शहराचा मुख्य रस्ता आहे. या रस्त्यांवर आधीच वाहनांची मोठी वर्दळ असते.

जेणेकरून वाहनकोंडी पाचवीला पुजलेली आहे. त्यातच मेट्रोचे काम सुरू झाल्यापासून रस्ता अरुंद होऊन वाहतूककोंडी वाढली आहे. मुख्य रस्त्यावर नो पार्किंग असून देखील दोन्ही बाजूला बेकायदा वाहन पार्किंग केली जात असल्याने समस्या आणखी गंभीर झाली आहे.

मुख्य रस्त्यावरील तुंगा रुग्णालय, गौरव गार्डन कॉम्प्लेक्स व जे बी डेकोर आदी बांधकामांसमोरील मोकळी जागा ही सरकारी आहे. या सरकारी जागेवर अतिक्रमण करण्यात. आले आहे. त्याचा वाणिज्य वा अन्य फायद्यासाठी बेकायदा वापर केला जात आहे.

तसे असताना ह्या जागेवरील



> महापालिकेने सरकारी जमीन वाहनतळसाठी मागितल्यास तसा प्रस्ताव वरिष्ठांना पाठवता येईल. परतु पालिकेने अजून तशी मागणी केलेली नाही. **- नंदकिशोर देशमुख,** अपर तहसीलदार, मीरा भाईंदर

अतिक्रमण महापालिका जाणीवपूर्वक काढत नाही. तर महसूल विभागाने देखील अतिक्रमण करणाऱ्यांवर गुन्हे दाखल केलेले नाहीत.

ही जागा बहुतांश मोकळी असून त्याठिकाणी वाहनतळ उभारल्यास मोठ्या प्रमाणात वाहन पार्किंगची सुविधा उपलब्ध होऊन रस्त्यावर होणारी बेकायदा पार्किंग थांबू शकते. नागरिकांची मोठी सोय होणार आहे.

शिवाय पालिकेला उत्पन्न देखील मिळू शकते. मात्र महापालिका आणि वाहतूक पोलिसांनी सदर जागा वाहनतळसाठी वापरात आणण्यास टाळाटाळ चालवली आहे. त्यामुळे वाहनचालकांची गैरसोय होत असून त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

लोकमत पु-पा-१.

# शिकवणीच्या शिक्षकाने केला मुलीचा विनयभंग

## आरोपीला अटक : सोमवारपर्यंत कोठडी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोडमध्ये खासगी शिकवणी घेणाऱ्या शिक्षकाने विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याप्रकरणी काशिमीरा पोलिसांनी शिक्षकास अटक केली आहे. त्याला सोमवारपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

जुलै २०१६ ते डिसेंबर २०१८ दरम्यान त्यावेळी नववी-दहावीत असलेली अल्पवयीन पीडित मुलगी ही मीरा रोड भागातील एका खासगी क्लासमध्ये जायची. त्यावेळी क्लासच्या शिक्षकाने मुलीस स्पर्श करून मिठी मारली. एका मद्याच्या कॅनमधील पेय पिण्यास दिले. कपडे काढायला लावून तिची छायाचित्रे काढली.

कोणास सांगू नये म्हणून धमकावले, अशा आशयाच्या फिर्यादीनुसार पोलिसांनी बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, भादंविमधील कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी मीरा रोड भागात राहणाऱ्या त्या ४४ वर्षीय खासगी क्लासच्या शिक्षकास अटक केली.

ठाणे न्यायालयाने त्याला सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिस निरीक्षक संदीप कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अमोल जाधव गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

CS CamScanner

सकाळ ५.१५-९.

# पोलिस महिलांना देणार 'पुन:धैर्य'

प्रकाश लिमये, भाईंदर

**पोलिसांकडे तक्रार दाखल होण्याआधी किंवा तक्रार दाखल झाल्यानंतर तडजोड करून प्रकरण शांततेने सोडविण्याचा सल्ला दिला जातो; पण तडजोड झाल्यानंतरही पुन्हा त्रास देण्याचे प्रकार घडतात. हे प्रकार टाळण्यास महिलांना धैर्य एकवटण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांच्या सूचनेनुसार पोलिसांकडून महिलांसाठी पुन:धैर्य योजना सुरू करण्यात आली आहे.**

तक्रारींचा पुन्हा आढावा

तोडगा निघालेल्या प्रकरणात महिलांना पुन्हा होणारा त्रास टाळण्यासाठी आयुक्त मधुकर पांडे यांच्या सूचनेनुसार पुन:धैर्य योजना सर्व पोलिस ठाण्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. संबंधित पोलिस ठाण्यामध्ये वर्षभरात महिलांकडून दाखल झालेल्या सर्वच तक्रारींचा आढावा घेतला जाणार आहे. पोलिस ठाण्यातील महिला पोलिस दर शनिवारी संबंधित महिलांशी संपर्क साधणार आहेत, त्यांच्याशी चर्चा करून त्यांच्या पुन्हा काही त्रास होत आहे का, याची चौकशी करणार आहेत. एखाद्या प्रकरणात तसेच आढळून आले, तर लगेचच कारवाई केली जाणार आहे. यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून नजर ठेवली जाणार आहे. छोट्या वाटणाऱ्या तक्रारीला भविष्यात गंभीर वळण लागू नये, यासाठी महिला पुन:धैर्य योजना महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

त्याचदा घरगुती प्रकरणात किंवा अन्य काही बाबतीत महिलांकडून पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येते. काही प्रकरणांमध्ये पोलिसांच्या भरोसा सेलच्या माध्यमातून दोन्ही बाजूच्या व्यक्तींना एकत्र बसवून यशस्वी तोडगादेखील काढला जातो. मात्र काही काळानंतर तोडगा निघालेल्या प्रकरणात महिलांना पुन्हा त्रास द्यायला सुरुवात झाल्याचे दिसून येत असते. संपूर्ण देशाला हादरवून सोडलेल्या श्रद्धा वालकर हत्या प्रकरणातही त्याचा प्रत्यय आला आहे. याप्रकरणात श्रद्धाने सुरुवातीच्या काळात दाखल केलेल्या तक्रारीवर यशस्वी तोडगा काढण्यात आला होता. मात्र त्याचा शेवट अत्यंत भयावह असा झाला. या घटनेवरून पोलिसही आता सतर्क झाले आहेत.

---

# करवतीसारख्या शस्त्राने केले तुकडे

## श्रद्धा हत्या प्रकरणातील शवविच्छेदन अहवालातून खुलासा

← सकाळ पा.नं. II

नवी दिल्ली, ता. १४ (पीटीआय) : मुंबईच्या श्रद्धाचा खून करून तिच्या शरीराचे तुकडे करण्यासाठी करवतीसारख्या धारदार शस्त्राचा वापर मारेकऱ्याने केल्याचे शवविच्छेदन अहवालात म्हटले आहे.

दहा दिवसांपूर्वीच्या मायट्रोकॉन्ड्रियल डीएनए अहवालात श्रद्धाचे केस आणि जंगलात सापडलेल्या हाडांचे नमुने जुळल्याचे म्हटले होते. गेल्या महिन्यांतील अन्य एका डीएनए अहवालात मेहरौली आणि गुरुग्रामच्या जंगलात पोलिसांना सापडलेली हाडे ही श्रद्धाचीच असल्याचे निष्पन्न झाले.

२६ वर्षीय श्रद्धा ही मेहरौलीत एका फ्लॅटमध्ये आरोपी आफताबसमवेत लिव्ह इनमध्ये राहत होती. या फ्लॅटमध्ये सापडलेले रक्ताचे नमुने हे श्रद्धाच्या रक्ताशी मिळतेजुळते होते. आरोपी आफताब हा सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. गेल्या महिन्यात आफताबची नार्को चाचणी केली होती. यात त्याने श्रद्धाच्या हत्येची कबुली दिली. त्याच वेळी पॉलिग्राफ चाचणीत देखील त्याने हत्येची कबुली दिली आहे. या हत्येचा आपल्याला पश्चात्ताप होत नसल्याचे म्हटले होते.

CS CamScanner

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष: 26 अंक-212 मुंबई, रविवार 15 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# ज्वैलर्स की दुकान से आभूषण चोरी मामले में महिला समेत दो गिरफ्तार, लाखों का माल जब्त

वसई: मीरा-भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत मध्यवर्ती क्राइम ब्रांच ने सुनार की दुकान में हाथ की सफाई से सोना चोरी करने वाले दो आरोपियों को गिरफ्तार किया है, जिसमे एक महिला आरोपी शामिल है, इनके पास से टीम ने वाहन सहित कुलमिलाकर 2,06,300 रूपये का माल जप्त किया है। यह सफलता डीपीसी (क्राइम ब्रांच ) अविनाश आंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में मध्यवर्ती क्राइम ब्रांच के प्रभारी पी.आई राहुल राख की टीम ने पाई है। पुलिस ने बताया कि शिकायतकर्ता पृथ्वीराज राजपुत की विरार पूर्व, फुलपाड़ा स्थित धर्मराज जैलर्स की दुकान है, आरोपी एक दुकानदार के रूप में आया व पृथ्वीराज राजपूत की दुकान से 7 ग्राम व 200 मिली सोने वजन (पीली धातु) की दो बालियां चुरा लीं। उक्त अपराध की समानांतर जांच मध्यवर्ती क्राइम ब्रांच द्वारा की जा रही थी, विरार पुलिस थाना अपराध पंजी क्रमांक 09/2023 आपराधिक संहिता धारा 379 मध्यवर्ती क्राइम ब्रांच के अधिकारियों एवं कर्मचारियों ने अपराध स्थल का दौरा किया और तकनीकी विश्लेषण के माध्यम से 1 दिन तक अभियुक्तों की तलाश की और उनके नामों की पहचान की। 12 जनवरी को सिलमेटीक कंपनी, ग्राम घोड़बंदर में जाल बिछाकर राजेश सायबण्णा कुडनुर ( 32 ) को गिरफ्तार किया गया, वही महिला पुलिस कर्मचारी द्वारा आरोपी छाया विनोद चव्हाण (45) को हिरासत में लेकर पूछताछ करने पर पता चला है कि वे उक्त अपराध में शामिल हैं। इनके पास से कुल 2,06,300 रुपये का सामान जैसे ईको मोटर कार, मोबाइल फोन और कैश बरामद किया गया है। उक्त हिरासत में राजेश सायबण्णा कुडनूर नाम के अभियुक्त की आगे की जांच पर, विभिन्न अपराध में उसकी संलिप्तता का पता चला है और कुल 3 अपराध (विरार, तुलिंज व माणिकपुर थाना) का खुलासा हुआ, यह आरोपी 2 मामलों (कासरवडवली व अंबरनाथ थाने में दर्ज ) में फरार था और इसके खिलाफ पूर्व में 4 अपराधों का मामला ( 1 वालीव व 3 अंबरनाथ थाने ) दर्ज होने का निष्पन्न हुआ है।




## लिस ने किया गिरफ्तार

सी.पी.डी.एस टीम ने उक्त मामले के सीसीटीवी फुटेज की जांच की और संदिग्ध व्यक्ति को देखा, बसई स्टेशन पर लगातार निगरानी की जा रही थी। 13 जनवरी को एक सतर्क आरपीएफ कर्मचारी एच.सी प्रकाश नौटियाल, सी.टी दिनेश सिंह, सी.टी अजीत सिंह ने आरोपी का पीछा किया और उसे वसई रोड प्लेटफॉर्म नंबर 01 से पकड़ लिया और पोस्ट पर ले आए। पूछताछ में उसने अपना त्रिभुवन रामसनेही भारती (37 ), निवासी- बरहरा, देवरिया, उ.प्र. बताया, वह उक्त चोरी के मामले में संलिप्त पाया गया।



CamScanner

'दोपहर का सामना' का रविवारीय संस्करण

संस्थापक संपादक : बाल ठाकरे

# संडे सामना

(वर्ष: ३०, अंक ३२३ मुंबई, रविवार १५ जनवरी २०२३ पेज १६ मूल्य: ₹ ३) एम.सी.डब्ल्यू/१६६/२०१८-२० ९३२४१७६७६९

को आदेश जारी करते हुए कहा है कि किसी भी महिला की डेड बॉडी का

है कि अनुच्छेद २१ भारतीय संविधान गरिमापूर्ण जीवन का अधिकार मात्र

कार्यकर्ता प्रमिला शर्मा द्वारा कोर्ट में पत्र प्रस्तुत किया गया था।

अख्तियार करने की अपेक्षा थी परंतु महाराष्ट्र राज्यकर्ता हमको नजरअंदाज कर रहे है।

# बस्तों के बोझ तले दब रहा बचपन!

- न शिक्षा विभाग की लगाम, न सरकार कस रही शिकंजा
- देश के भविष्य को बीमार कर रहा भारी बस्ता



योगेंद्र सिंह ठाकुर / पालघर

किताबों के बीच सिसकते बचपन ने शिक्षा की बुनियाद को हिलाकर रख दिया है। एक छोटे बच्चे के लिए दस-बारह किताबें रोज स्कूल ले जाना और उन्हें पढ़ना कठिन होता है, इसका सहज अंदाजा लगाया जा सकता है। अब हालात ऐसे हो गए है कि भारी बैग के दबाव के कारण बच्चे गर्दन, पीठ दर्द का तो शिकार हो ही रहे है, साथ ही बस्ते के बढ़ते अनावश्यक बोझ से बच्चे मानसिक रूप से कुंठित भी हो रहे है। शिक्षा एवं स्मार्ट स्कूलों का दावा करनेवाले प्राइवेट स्कूल, नर्सरी एवं प्राइमरी कक्षाओं में बस्ते के वजन को लेकर जारी नियमों की खुलेआम धज्जियां उड़ाते दिख रहे है।

छोटी कक्षाओं के बच्चों के बस्ते (बैग) का वजन भी बड़ी कक्षाओं के बच्चों से भारी है। इससे अंग्रेजी माध्यम की पढ़ाई करनेवाले बच्चे बोझ की मार झेल रहे है।

स्कूल बैग का बढ़ता बोझ निरंतर चिंता का विषय बना हुआ है। भारी बैग की वजह से बच्चों के कंधों पर जरूरत से अधिक दबाव पड़ता है। बच्चों के परिजनों का कहना है कि केजी के बच्चे के बैग का वजन २ किलो तक होता है, जबकि दूसरी क्लास तक पहुंचते-पहुंचते यह बढ़कर ४ किलो हो जाता है। पांचवी में स्कूल बैग का वजन ५ से ७ किलो तक हो जाता है। पालघर जिले में प्राइमरी में करीब दो लाख से ज्यादा बच्चे पढ़ते है। प्राइवेट स्कूलों में मासूमों पर बस्ते का भार कम करने के लिए न तो शिक्षा विभाग किसी तरह की लगाम लगा रहा है न तो सरकार शिकंजा कस रही है।

## कितना होना चाहिए बच्चों के बैग का वजन

पहली क्लास से दूसरी क्लास: बैग का वजन १.५ किलोग्राम होना चाहिए।
तीसरी क्लास से चोथी क्लास: बैग का वजन २ किलोग्राम से ३ किलोग्राम तक।
छठी क्लास से सातवी क्लास: बैग का वजन ४ किलोग्राम तक।
आठवी क्लास से नौवी क्लास: बैग का वजन ४.५ किलोग्राम तक।

प्राइवेट स्कूलों की नर्सरी व प्राइमरी स्कूलों के छोटे बच्चों में बस्ते के बोझ के चलते कंधे में दर्द,, गर्दन एवं पीठ में दर्द की बीमारी बढ़ रही है। जिन बच्चों में कैल्सियम की कमी है उनके लिए यह खतरनाक साबित हो रही है। वे ऐसे बच्चे है, जो हमेशा एक ही कंधे पर बस्ता रखकर स्कूल आते-जाते है।

**डॉक्टर जितेंद्र बोहरा पालघर**

स्कूल बैग का वजन ज्यादा होने से बच्चे खुद का बैग भी नही उठा पाते। एक अभिभावक के रूप में, मुझे लगता है कि स्कूलों को समय सारिणी का सख्ती से पालन करना चाहिए और बच्चो को अतिरिक्त कक्षाओं के लिए अतिरिक्त किताबें लाने के लिए नही कहना चाहिए। साथ ही स्कूलों में बच्चों के लिए लॉकर की व्यवस्था होनी चाहिए।

**लक्ष्मी ठाकुर, अभिभावक**

CamScanner

सर्व देशवासियांना मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा

दैनिक आमची मुंबई

ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.

रविवार १४ जानेवारी २०२४

Post Reg. No. PTL/158/2022-2024

# मकर संक्रांतीच्या दिवशी RPF ने पकडला मोबाईल आणि खिसा चोर

**नालासोपारा.** मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर नालासोपारा आरपीएफने मोबाईल फोन आणि खिसा चोरणाऱ्याला अटक केली आहे. चोरट्याला जीआरपी वसईच्या ताब्यात देण्यात आले आहे. १३ जानेवारी रोजी आरपीएफ सीपीडीएस नालासोपारा एएसआय भगवान सिंग गुर्जर, सीटी कृष्ण कुमार सैनी आणि कर्तव्यावर असलेले कर्मचारी सीटी कुलदीप सिंग, सीटी नीरज जांगीड आणि एल/सी एक नेहमीच्या मोबाइल चोराला टी. अन्नो बाई मीना यांनी रंगेहात पकडले होते. नालासोपारा पश्चिम प्लॅटफॉर्म क्रमांक १ वरून नालासोपारा स्थानक दक्षता (TOPB), इंझमाम इक्बाल परदेशी (२३), रा/ओ- नालासोपारा पश्चिम येथे राहणार आहे. त्याने प्रवाशाच्या खिशातून पर्स आणि मोबाईल (एकूण २७,५०० रुपये) चोरल्याच्या गुन्ह्याची कबुली दिली. याच आरोपी इंझमामला नालासोपारा स्टेशन सर्व्हेलन्स (TOPB) दरम्यान RPF ने नालासोपारा येथून एका नेहमीच्या पिक पॉकेटरकडून रंगेहात पकडले. प्लॅटफॉर्म क्रमांक १. पकडले असता, त्याने प्रवाशाच्या खिशातून पर्स (५१० रुपये) चोरल्याचा गुन्हा कबूल केला. जीआरपी वसईने दोन्ही प्रकरणी स्वतंत्र एफआयआर नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.



CamScanner

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष : 26 अंक-212 मुंबई, रविवार 15 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# नालों पर से ढक्कन चुराने वाले पांच चोर गिरफ्तार

**वसई:** लूटपाट व वाहन चोरी करने के मामले में वालीव पुलिस स्टेशन की डिटेक्शन ब्रांच की टीम ने 5 शातिर चोर को धर दबोच कर उन्हें गिरफ्तार किया है। इनकी गिरफ्तारी से 8 अपराधों की गुत्थी सुलझी व 2 लाख से अधिक माल जप्त किया गया है। पुलिस ने बताया कि,28 दिसंबर व 29 दिसंबर सुबह 10 बजे के दरम्यान अज्ञात चोर तुंगारेश्वर औद्योगिक परिसर में घुसे और कंपनी के सामने वाले नाले से 70,000 रुपये मूल्य के 7 लोहे के ढक्कन चुरा ले गये,इस मामले में वालीव पुलिस ने अज्ञात चोर कर खिलाफ केस दर्ज किया था। पुलिस ने कहा




कि उक्त मामले वलीव थाने की डिटेक्शन ब्रांच के अधिकारियों व कर्मचारियों ने मुखबिरों से मिली जानकारी के आधार पर वरिष्ठों के मार्गदर्शन में तकनीकी जांच की,रिकॉर्ड के साथ-साथ अन्य अभियुक्तों में विकी नरेंद्र सिंह (21),हेंमत रमेश मोकाशी (25),अजित शिबु ठाकुर (30),विघ्नेश केशव पारधी (22) व मोतीम अब्दुल रज्जाक खान (21) को हिरासत में लेकर पूछताछ की गई तो जांच में पता चला कि उसने उपरोक्त अपराध किया है और उसे गिरफ्तार कर लिया गया,पुलिस ने बताया कि जांच के दौरान,जब आरोपियों से और पूछताछ की गई, तो उन्होंने कहा कि वलीव पुलिस स्टेशन के रिकॉर्ड पर और वनराई पुलिस स्टेशन,मालाड पुलिस स्टेशन, मुंबई की सीमा के भीतर चोरी के अपराध किए हैं।इनके पास से चोरी के ऑटो रिक्शा,मोटरसाइकिल,मैनहोल कवर, सिलेंडर की बोतलें, नकदी, ऑटो रिक्शा टायर, बैनर फ्रेम कुलमिलाकर 2,60,000 रुपये का माल जप्त किया है।

CS CamScanner

दैनिक

एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई.

# मुंबई केसरी टाइम्स

www.mumbaikesaritimes.com

वर्ष : १५ अंक : २१९ रविवार 15 जनवरी 2023 मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/95/2020/2022 पृष्ठ : 04

# मध्यवर्ती क्राइम ब्रांच को मिली सफलता:महिला सहित 2 आरोपी गिरफ्तार,कई मामलों का पर्दाफाश

**वसई ;** मीरा-भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत मध्यवर्ती क्राइम ब्रांच ने सुनार की दुकान में हाथ की सफाई से सोना चोरी करने वाले दो आरोपियों को गिरफ्तार किया है,जिसमे एक महिला आरोपी शामिल है, इनके पास से टीम ने वाहन सहित कुलमिलाकर 2,06,300 रूपये का माल जप्त किया है।यह सफलता डीपीसी (क्राइम ब्रांच ) अविनाश आंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में मध्यवर्ती क्राइम ब्रांच के प्रभारी पी.आई राहुल राख की टीम ने पाई है। पुलिस ने बताया कि शिकायतकर्ता पृथ्वीराज राजपुत की विरार पूर्व,फुलपाड़ा स्थित धर्मराज ज्वैलर्स की दुकान है, आरोपी एक दुकानदार के रूप में आया व पृथ्वीराज राजपूत की दुकान से 7 ग्राम व 200 मिली सोने वजन (पीली धातु) की दो बालियां चुरा लीं। उक्त अपराध की समानांतर जांच मध्यवर्ती क्राइम ब्रांच द्वारा की जा रही थी,विरार पुलिस थाना अपराध पंजी क्रमांक 09/2023 आपराधिक संहिता धारा 379 मध्यवर्ती क्राइम ब्रांच के अधिकारियों एवं कर्मचारियों ने अपराध स्थल का दौरा किया और तकनीकी विश्लेषण के माध्यम से 1 दिन तक अभियुक्तों की तलाश की और उनके नामों की पहचान की।

12 जनवरी को सिलमेटीक कंपनी, ग्राम घोड़बंदर में जाल बिछाकर राजेश सायबण्णा कुडनुर ( 32 ) को गिरफ्तार किया गया,वही महिला पुलिस कर्मचारी द्वारा आरोपी छाया विनोद चव्हाण (45) को हिरासत में लेकर पूछताछ करने पर पता चला है कि वे उक्त अपराध में शामिल हैं।इनके पास से कुल 2,06,300 रुपये का सामान जैसे ईको मोटर कार, मोबाइल फोन और कैश बरामद किया गया है।उक्त हिरासत में राजेश सायबण्णा कुडनूर नाम के अभियुक्त की आगे की जांच पर, विभिन्न अपराध में उसकी संलिप्तता का पता चला है और कुल 3 अपराध (विरार, तुलिंज व माणिकपुर थाना) का खुलासा हुआ,यह आरोपी 2 मामलों (कासरवडवली व अंबरनाथ थाने में दर्ज ) में फरार था और इसके खिलाफ पूर्व में 4 अपराधों का मामला ( 1 वालीव व 3 अंबरनाथ थाने ) दर्ज होने का निष्पन्न हुआ है।

CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-212 मुंबई, रविवार 15 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# आरपीएफ के हत्थे चढ़ा शातिर पाकेटमार

**नायगांव:** मकर संक्रांति के अवसर पर नालासोपारा आरपीएफ ने मोबाइल फोन व पॉकेट मार चोर को गिरफ्तार किया है। चोर को जीआरपी वसई के हवाले कर दिया गया है। बताया गया है कि 13 जनवरी को आरपीएफ सी.पी.डी.एस नालासोपारा ए.एस.आई भगवान सिंह गुर्जर, सी.टी कृष्णा कुमार सैनी और ऑन ड्यूटी स्टाफ सी.टी कुलदीप सिंह, सी.टी नीरज जांगिड़ और एल/सी.टी अन्नो बाई मीणा द्वारा नालासोपारा स्टेशन की निगरानी के दौरान (टी.ओ.पी.बी) रंगे हाथ एक आदतन मोबाइल चोर को नालासोपारा पाश्चिम प्लेटफॉर्म नं.1 से पकड़ा, जिसका नाम इंजमाम इकबाल परदेशी ( 23 ), निवासी- नालासोपारा पश्चिम का रहने वाला है। उसने यात्री की जेब से पर्स और मोबाइल चोरी (कुलमिलाकर 27,500 रुपये ) करने के अपने अपराध को स्वीकार किया।यही आरोपी इंजमाम को आरपीएफ द्वारा नालासोपारा स्टेशन की निगरानी के दौरान (टीओपीबी) रंगेहाथ एक आदतन पिक पॉकेट मार को नालासोपारा प्लेटफॉर्म नं.1 से पकड़ा, उसने यात्री की जेब से पर्स (510 रुपये) चोरी करने का अपना अपराध कबूल किया। दोनो मामलों में जीआरपी वसई ने अलग - अलग एफआईआर दर्ज कर आगे की तहकीकात कर रही है।




CamScanner

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष: 26 अंक-212 मुंबई, रविवार 15 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# अलग-अलग स्टेशनों से दो शातिर चोरों को पुलिस ने किया गिरफ्तार

**वसई:** विरार और वसई आरपीएफ ने सीसीटीवी के माध्यम से दो शातिर चोरो को गिरफ्तार करने में सफलता पाई है। गिरफ्तार चोरो को वसई जीआरपी के हवाले कर दिया है। यह कार्रवाई 13 जनवरी को आरपीएफ ने की है। बताया गया है कि विरार प्लेटफॉर्म नं.4 पर 6 जनवरी को एक यात्री का मोबाइल फोन (8,000 रुपये ) चोरी हो गया था।इस मामले में आरपीएफ सी.पी.डी.एस टीम ने उक्त चोरी के मामले के फुटेज की जांच की और विरार स्टेशन के आसपास के क्षेत्र में लगातार निगरानी की जा रही थी,तभी 13 जनवरी को सी.पी.डी.एस टीम,सी.टी प्रधान चौधरी सी.टी राकेश तंवर द्वारा विरार स्टेशन से एक संदिग्ध व्यक्ति को पकड़ा गया, कोई संतोषजनक जवाब नहीं देने के कारण पोस्ट पर लाया गया, आगे की पूछताछ में उसने अपने कमलेश रजनीकांत शाह (32) बताया,उसने मोबाइल चोरी का अपराध स्वीकार किया।सबसे बड़ी बात यह कि आरपीएफ विरार द्वारा 7 बार पकड़ा जा चुका है।दूसरी घटना ; 11 जनवरी को



एक यात्री का कपड़े के टुकड़े बंडल (5,000 रुपये ) वसई रोड पूर्व बुकिंग स्थित चोरी हो गया था।इस मामले जीआरपी वसई ने केस दर्ज किया था।12 जनवरी को आरपीएफ वसई सी.पी.डी.एस टीम ने उक्त मामले के सीसीटीवी फुटेज की जांच की और संदिग्ध व्यक्ति को देखा,वसई स्टेशन पर लगातार निगरानी की जा रही थी। 13 जनवरी को एक सतर्क आरपीएफ कर्मचारी एच.सी प्रकाश नौटियाल, सी.टी दिनेश सिंह, सी.टी अजीत सिंह ने आरोपी का पीछा किया और उसे वसई रोड प्लेटफॉर्म नंबर 01 से पकड़ लिया और पोस्ट पर ले आए। पूछताछ में उसने अपना त्रिभुवन रामसनेही भारती (37 ),निवासी- बरहरा, देवरिया, उ.प्र. बताया, वह उक्त चोरी के मामले में संलिप्त पाया गया।

CS CamScanner